सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/७८३ दिनांक : १८/०१/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१८ या कालावधीतील जिवंत रोपाची संख्या व टक्केवारीची माहिती.
संदर्भ क्र. : या विभागाचे विविमं/२०१८–१९/१२०, दि. १७/०७/२०१८ चे पत्र.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आपण सन २०१७–२०१९ या तीन वर्षामध्ये ५० कोटी वृक्ष लागवड उपक्रमात सहभागी झालो आहोत. या लागवड केलेल्या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्याबाबत आपल्यास्तरावर योग्य ती काळजी घेण्याबाबत कळविण्यात आले होते. आपण केलेल्या वृक्षलागवडीची माहिती ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात आली होती. तसेच वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अहवाल, अंतिमतः संगोपन आणि जिवंत असलेल्या रोपाची संख्या व टक्केवारी यांचा त्रैमासिक अहवाल विहित प्रपत्रामध्ये पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये **माहे जुलै २०१८ मध्ये केलेल्या वृक्ष लागवडीपैकी दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत सद्यस्थितित जिवंत रोपाची संख्या व टक्केवारी अशा दोन्ही प्रकारची माहिती पुढील लिंकवर (www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal Report– Tree Plantation Programe Report) दि. २८/०१/२०१९ पर्यंत** भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्याबाबत काळजी घ्यावी आणि **या कालावधीत लागवड केलेल्या वृक्षांचा प्रत्यक्षदर्शी अहवाल, अंतिमतः संगोपन आणि जिवंत असलेल्या रोपाची संख्या व टक्केवारी यांचा त्रैमासिक अहवाल ऑनलाईन पद्धतीने वेळोवेळी** पाठविण्यात यावा.

सदर माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने प्राधान्याने माहिती पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

(टीप : ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी यापूर्वी माहे जुलै, २०१८ मधील वृक्ष लागवड आणि माहे जुलै ते सप्टेंबर या कालावधीतील जिवंत रोपाची संख्या व टक्केवारी ही माहिती भरलेली आहे. त्याच माहितीच्या आधारे जिवंत रोपाची संख्या व टक्केवारीची माहिती वरील लिंकवर ऑनलाईन पद्धतीने भरावी.)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/१२० **स्मरणपत्र** दिनांक : १७/०७/२०१८

**<u>तात्काळ व कालमर्यादेचे</u>**

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : माहे जुलै, २०१८ मधील वृक्ष लागवड माहिती.
संदर्भ क्र. : या विभागाचे विविमं/२०१८–१९/३६, दि. ०२/०७/२०१८ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत माहे जुलै, २०१८ मध्ये केलेल्या वृक्षलागवडीची माहिती ऑनलाईन पद्धतीने **<u>दि. १२/०७/२०१८ पर्यंत मागविण्यात आली होती.</u>**

परंतु अद्यापही बहुतांशी महाविद्यालय/परिसंस्थांची माहिती प्राप्त झालेली नाही. **माहे जुलै, २०१८ मध्ये केलेल्या वृक्षलागवडीची माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने खालील लिंकवर <u>(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal Report– Tree Plantation Programe Report 2018-19)</u> माहिती दि. २५ जुलै, २०१८ पर्यंत पाठविण्यात यावी**.

तसेच आपणास असेही कळविण्यात येते की, या वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्याबाबत काळजी घ्यावी आणि या कालावधीत लागवड केलेल्या वृक्षांचा प्रत्यक्षदर्शी अहवाल, अंतिमत: संगोपन आणि जिवंत असलेल्या रोपाची संख्या व टक्केवारी यांचा त्रैमासिक अहवाल ऑनलाईन पद्धतीने वेळोवेळी पाठविण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ